# भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था : एक आढावा

**अर्पित मनोहर थुल**

---

***सारांश :***

*या शोध लेखा मध्ये, भारतातील प्राचिन काळापासून ते ब्रिटिश राजवटी पर्यंत भारतातील स्थानीक स्वराज्य संस्थांची विशेष हेतुने उभारणी, यांची कार्यपध्दती, स्थानीक नागरिकांना केंद्रबिंदू समजून ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती विविध कायद्या अंतर्गत केल्याचा उल्लेख या लेखात करण्यात आला आहे.*

---

**परिचय :**

स्थानिक स्वशासन, स्थानिक प्रशासन संस्था, स्थानिक सत्ता इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्था या नावाने परीचित असून जनतेच्या प्राथमिक गरजांशी निगडित कार्य करणारी, स्थानिक पातळीवर कार्य करणारी संस्था म्हणजे स्थानिक शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्था होय. त्र्याहतराव्या घटना दुरूस्ती नुसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य व चौऱ्याहत्तराव्या घटना दुरूस्ती नुसार, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार हा आपल्यातून स्थानिक जनतेनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत नियंत्रीत करून चालविला जातो. सदर संस्था मध्यवर्ती शासन, घटक राज्याचे शासन यांच्या नियंत्रणानुसार व मागदर्शनानुसार कार्य करत असतात. स्थानिक शासन हा शब्द राज्यघटनेने राज्य सूचित नमूद केला आहे. आपल्या देशातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचा समावेश होतो तर नागरी स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये नगरपालिका, नगरपरिषद, महानगर पालिका, नगरपंचायत, औद्योगिक नगरी आणि छावणी मंडळ, कटक मंडळ इत्यादींचा समावेश येतो.

**प्राचीन ग्रामपंचायती :**

ग्रामपंचायत ही संस्था भारतातील जुन्या काळापासून, वैदिक काळापासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. प्राचीन काळात खेडयांचा कारभार स्थानिक लोकांमार्फत ग्रामपंचायत या संस्थेद्वारे नियंत्रित केला जात असून भारतातील खेडयांना स्वायत्त घटकाचे स्वरूप होते तसेच ग्रामीण समाज स्वायत्त, स्वयंपूर्ण व स्वयंशासित असल्याचे, गरजांची पूर्तता करण्याकरिता स्वत:ची आर्थिक व्यवस्था यातून ग्रामीण समाजाला आर्थिक स्वयंपूर्णतेला राजकीय स्वायत्तेची जोड होती. हा कारभार चालविण्या करिता ग्रामपंचायत अशी संस्था उभारण्यात आली होती.

Research Hub International Journal

स्थानिक पातळीवरील कारभार स्थानिक लोकांनीच चालविणे तसेच स्थानिक पातळीवरील कामे लोकांच्या सहभागातून, सहकार्यातून पार पडणे अशी कार्य प्राचीन काळात होती. इंग्रजी राज्यकर्त्यांनी राजकीय सत्तेच्या केंद्री करणावर भर देवून जमीन महसूल जमा करण्याचे ग्रामपंचायतीचे अधिकार काढून या कामासाठी पगारी नोकर वर्गाच्या नेमणूका करून स्वतंत्र न्यायव्यवस्था इंग्रजानी निर्माण केले, यामुळे ग्रामपंचायतीची उपयुक्तता संपूष्टात आली.

**ब्रिटिश काळातील स्थानिक स्वराज्य संस्था :**

भारतातील ग्रामीण तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मीती ब्रिटिश राज्यकर्त्यांनी करण्याचे पुढाकार घेऊन या संस्थांना प्रतिनिधिक स्वरूप प्राप्त करून दिले. प्राचीन ग्रामपंचायती व स्थानिक पातळीवर कार्य करणाऱ्या विविध संस्था यांना ऐतिहासिक परंपरा लाभली असली तरी या संस्थांची निर्मिती लोकशाही तत्वावर नव्हती यात बऱ्याच उणिवा होत्या, या संस्थांच्या रचना व कार्य पध्दतीवर जाती व्यवस्थेचा प्रभाव होता. भारतीय नागरिकांच्या राजकीय दबावामुळे ब्रिटिश शासनानी स्थानिक स्वराज्य संस्थंना अधिक प्रतिनिधिक स्वरूप व अधिकारात वाढ करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास ब्रिटिश राजवटीनी नागरी संस्थापासून सुरूवात केली असून इ.स. १७९३ या सनदी कायद्याने मद्रास, कलकत्ता व मुंबई या शहरात जस्टिस ऑफ पीस (Presidency Towns) ची नियुक्ती सोबत कर लावण्याचे अधिकार, शहर – स्वच्छता शांतता आणि सुव्यवस्था रक्षण इत्यादी कार्य करण्याची मुभा देण्यात आली. ब्रिटिश सरकारने नगर पालिकांसारख्या संस्था स्थापन करण्या करिता वेळोवेळी कायदे करण्याचा प्रयत्न केला पण काही कारणास्तव अश्या संस्था प्रत्यक्षात आल्या नाही.

**स्थानिक स्वराज्य संस्थानांच्या विकासाकरिता कायदे :**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून उभारणी करिता विविध कायदे करण्यात आले असून यात लॉर्ड मेयोचा इ. स. १८७० चा ठराव, लॉर्ड रिपनचा १८८२ चा ठराव, जिल्हा लोकल बोर्डची स्थापना, विकेंद्रीकरणा संबंधीच्या रॉयल कमिशन इ. स. १९०७, भारत सरकारचा १९१८ चा ठराव, भारत सरकारचा इ. स. १९१९ चा कायदा, इ.स. १९२० चा ग्रामपंचायत कायदा, इ.स. १९२३ चा लोकल बोर्ड कायदा, इ. स. १९३५चा कायदा, मुंबई प्रंताचा १९३८ चा कायदा, आणि इ.स. १९३९ चा ग्रामपंचायत कायदा.

**निष्कर्ष :**

भारतातील प्राचिन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थांची परंपरा असून या संस्था विविध स्वरूपात कार्य करत आहे. ग्रामिण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्थानिक नागरिक आपला प्रतिनिधी निवडणूकीच्या माध्यामातून अश्या संस्थांमध्ये निवडून आलेला

प्रतिनिधी जनतेच्या विकासाची महत्वाची भूमिका बजावत प्रतिनिधीत्व कराव अशी स्थानिक नागरीकांची कायदया अंतर्गत अपेक्षा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास व वाढ या करिता ब्रिटिश राजवटिपासून विविध कायदे करण्यात आले.

**संदर्भ :**


- नरूला, बी. सी. (२००९). पंचायती राजव्यवस्था. नई दिल्ली: अर्जुन पब्लिशिंग हाउस
- पाटील, व्ही.बी. (२००९). भारतीय प्रशासन. पुणे : के'सागर पब्लिकेशन्स
- यादव, धर्मेंद्र सिंह. (२००६). पंचायती राज एवं ग्रामीण विकास. मुंबई : रावत पब्लिकेशन्स
- वीर, गौतम. (२००९). पंचायती राज व्यवस्था. नई दिल्ली: ओमेगा पब्लिकेशन्स.


Research Hub International Journal